# महाराष्ट्र शासन
## संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई
## DIRECTORATE OF MEDICAL EDUCATION & RESEARCH
Govt. Dental College & Hospital Building, St. George's Hospital Compound, Mumbai - 400 001.
Tel.No. +91-22-2620361-65 Telegram:" MEDUCATNSEARCH"
Fax:+91-22- 2620562/ 2652168 Website :http://www.dmer.org


**क्र. संवैशिवसं/नोटिफिकेशन/अल्पसंख्यांक/शिष्यवृत्ती/१-अ,** **दिनांक : १८/२/२००९.**

## नोटिफिकेशन

### अल्पसंख्यांक समाजातील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना

महाराष्ट्र शासनाने **मुस्लीम, शिख, बौध्द, ख्रिश्चन, जैन व पारशी** या समाजातील व्यावसायिक आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अर्थिकदृष्टया दुर्बल व गुणवत्ताधारक शैक्षणिक वर्ष २००८-२००९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना लागू केलेली आहे. या जाहिरातीद्वारे शैक्षणिक वर्ष २००८-२००९ करीता **शिष्यवृत्तीसाठी** अर्ज मागविण्यात येत आहेत.

**शिष्यवृत्तीसाठी समाविष्ट अभ्यासक्रम:** **एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीयुएमएस, बीएचएमएस, बीपीटीएच, बीओटीएच, बीएससी नर्सिंग, बीएएसएलपी, बीपी अॅन्ड ओ**

**किमान पात्रता व अटी :-**

१. अर्जदार **भारतीय नागरिक, वर उल्लेख केलेल्या अल्पसंख्यांक समाजातील व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी** असावा. तसेच त्याने शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली असावी.

२. **स्पर्धात्मक परीक्षेद्वारा** अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला विद्यार्थी पात्र राहील अथवा स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी न झालेल्या विद्यार्थ्यांची निवड १२ वी व तत्सम परीक्षेतील गुणवत्तेनुसार होईल.

३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.

४. अर्जदाराच्या पालकाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न **रु. २.५० लाखांपेक्षा** जास्त नसावे.

५. अर्जदाराचे **राष्ट्रीयकृत किंवा शेडयूल्ड बॅंकेमध्ये खाते** असणे आवश्यक आहे.

**योजनेची सविस्तर माहिती व अर्जाचा नमूना :-**

(१) शिष्यवृत्तीची तपशीलवार माहिती, अर्जाचा नमुना, अर्ज करावयची पध्दती, पात्रता, अभ्यासक्रमांची यादी व विद्यार्थ्यांनी संस्थेमार्फत अर्ज सादर करावयाचे वेळापत्रक इत्यादी या संचालनालयाच्या **www.dmer.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी हेल्प लाईन दूरध्वनी क्र. (०२२) २२६५ २२५७ / ५९ वर संपर्क साधावा.

(२) या संबंधीचा अर्जाचा नमूना १) राज्य अल्पसंख्याक आयोग, २) मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, ३) सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, ४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांची कार्यालये, ५) सर्व सहसंचालक, संचालक तंत्रशिक्षण, संचालनालय यांची कार्यालये, ६) मिटकॉन तसेच या संचालनालयात सुध्दा उपलब्ध आहे.

(३) विद्यार्थ्यांना अर्ज डाऊनलोड करुन पूर्ण भरुन महाविद्यालये/संस्था/विद्यापीठे यांचेकडे सादर करण्याचा अंतिम **दिनांक २६ फेब्रुवारी, २००९** आहे. प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची छाननी करुन महाविद्यालयांमार्फत संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, सीईटी कक्ष, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारती समोर, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ या पत्त्यावर **दिनांक ४ मार्च, २००९** पर्यंत सादर करण्याची जबाबदारी संस्थेच्या प्राचार्य/अधिष्ठाता यांची राहिल. विहीत मुदतीनंतर प्राप्त अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

(४) विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मंजूर झाल्यास सदर रक्कम विद्यार्थ्याच्या बॅंक खात्यामध्ये प्राचार्यांमार्फत जमा करण्यात येईल.

**विहित कालावधीत संस्थेमार्फत प्राप्त झालेल्या अर्जाचाच विचार केला जाईल. विद्यार्थ्यांकडून परस्पर प्राप्त झालेले अर्ज किंवा अपूर्ण अर्ज अस्वीकृत करुन फेटाळले जातील याची कृपया नोंद घ्यावी.**

**सही/-**
**संचालक**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**